मंगळवार, दि. २९ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अतिवृष्टीचा हाहाकार: शेतकऱ्यांचे पिकं उद्ध्वस्त

### तात्काळ मदतीची आमदार लोणीकर यांची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदारसंघात दिनांक २१ जुलै २०२५ पासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे आणि गेल्या सहा दिवसांपासून सतत पडणाऱ्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परतूर तालुक्यातील सातोना (१०० मि.मी.), आष्टी (१०९ मि.मी.) आणि मंठा तालुक्यातील तळणी (१४७ मि.मी.) या मंडळांमध्ये केंद्र सरकारच्या ६५ मि.मी. पेक्षा जास्त पावसाच्या अतिवृष्टीच्या निकषानुसार गंभीर परिस्थिती उद्भवली आहे. या पावसामुळे कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद यासह इतर पिके पूर्णपणे खराब झाली असून, पिकांची मुळे सडल्याने शेतकऱ्यांचे यावर्षीचे संपूर्ण पीक जवळपास वाया गेले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचले आहे, ज्यामुळे पिके पाण्याखाली गेली आहेत. कापूस आणि सोयाबीनसारखी प्रमुख पिके खरडून गेली असून, शेतकऱ्यांचे हातातोंडाशी आलेले उत्पन्न नष्ट झाले आहे. परतूर विधानसभा मतदारसंघात पूर्वी १० महसूल मंडळे होती, परंतु महसूल विभागाच्या नवीन रचनेनुसार आता १४ मंडळे आहेत. नव्याने स्थापन झालेल्या चार मंडळांमध्ये पर्जन्यमापक यंत्र नसल्याने पावसाची अचूक नोंद होत नाही. तरीही या मंडळांमध्येही अतिवृष्टी सदृश परिस्थिती आहे, ज्यामुळे तेथील शेतकऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे अगोदरच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट बनली आहे. शेतकरी हवालदिल झाले असून, त्यांना तात्काळ आर्थिक मदत आणि पुनर्वसनाची गरज आहे. आमदार बबनराव लोणीकर यांनी या गंभीर परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधताना म्हटले आहे, परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले आहे. सातोना, आष्टी आणि तळणी मंडळांमध्ये अनुक्रमे १०० मि.मी., १०९ मि.मी. आणि १४७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे, जी केंद्र सरकारच्या अतिवृष्टीच्या निकषानुसार गंभीर आहे. संपूर्ण मतदारसंघातील १४ महसूल मंडळांमध्ये सतत सहा दिवस पडणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांचे पिक उद्ध्वस्त झाले आहे. कर्जबाजारी शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत गंभीर आहे. शेतकऱ्यांचे सरकार म्हणून महाराष्ट्र शासनाने तात्काळ पावले उचलून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करावी.



**आमदार लोणीकर यांनी शासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत:**

परतूर विधानसभा मतदारसंघातील सर्व १४ महसूल मंडळांमध्ये त्वरित पंचनामा करून नुकसान भरपाई तात्काळ वितरित करावी.

पर्जन्यमापक यंत्राची स्थापना: नव्याने स्थापन झालेल्या चार मंडळांमध्ये तात्काळ पर्जन्यमापक यंत्र बसवावे, जेणेकरून पावसाची अचूक नोंद होईल आणि नुकसान भरपाई प्रक्रिया सुलभ होईल.

विशेष आर्थिक पॅकेज: कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, ज्यामुळे त्यांना पुन्हा शेती सुरू करण्यासाठी आधार मिळेल.

पीक विमा योजनेचा लाभ: शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा त्वरित लाभ मिळवून देण्यासाठी ई-पीक पाहणी आणि आधार-लिंक बँक खात्याची पूर्तता करावी.

केवायसी पूर्तता: शेतकऱ्यांना आपले सरकार सेवा केंद्रात केवायसी पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करावे, जेणेकरून अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होईल.

आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी स्थानिक कृषी विभागाशी संपर्क साधून आपल्या नुकसानीची नोंद करावी आणि पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा. केंद्र सरकारच्या कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७ वर संपर्क साधून अधिक माहिती मिळवावी. तसेच, ई-पीक पाहणी पूर्ण करून आणि घधउ प्रक्रिया पूर्ण करून नुकसान भरपाई प्रक्रिया सुलभ करावी. परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांची परिस्थिती अतिवृष्टीमुळे अत्यंत गंभीर बनली आहे. शेतकऱ्यांचे सरकार म्हणून महाराष्ट्र शासनाने तात्काळ आणि पुरेशी आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे. स्थानिक प्रशासन, कृषी विभाग आणि विमा कंपन्यांशी समन्वय साधून शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांच्या या दुखावरील मलम म्हणून शासनाने संवेदनशीलता दाखवावी, अशी विनंतीही आ. लोणीकर यांनी केली आहे.



**श्रावण महिन्यातील पहिला सोमवारी पंचमुखी महादेवाला भक्तगणांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत आहे (छायाचित्र - किरण खानापुरे)**

## ओटीटीवरील अश्लीलतेला सरकारचा लगाम!

### ॲड अश्विनी धन्नावत यांच्या पाठपुराव्यास यश

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक कार्यकर्त्या तथा बाल न्याय मंडळाच्या सदस्य ॲड. अश्विनी महेश धन्नावत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. माहिती व प्रसारण मंत्रालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत, भारतातील २५ ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे अनेक वादग्रस्त, अश्लीलता पसरवणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सला आता कायमचा लगाम लागणार आहे.



उल्लू, एएलटीटी, देसीफ्लिक्स यांसारख्या काही नामांकित ओटीटी ॲप्सचा समावेश या बंदीतील प्रमुख यादीत आहे. या प्लॅटफॉर्म्सवर महिलांचे अशोभनीय प्रदर्शन, लैंगिक आशय असलेली सामग्री आणि नैतिकतेच्या सीमरेषा ओलांडणारे कंटेंट सातत्याने **पान २ वर**

**आता ऑनलाइन गेम्सवरही बंदीची मागणी**

युवा आदर्श

### नाग ...

**नागपंचमी सण येता**
**नागास वाटते भिती**
**माणूस विषारी आहे**
**करतो गमती जमती**
**निमीत्त फक्त पुजेचे**
**गारूडी त्या पकडती**
**खेळ दाखवी अघोरी**
**उगाचं छळत राहती**
**बळजबरी दूध पाजी**
**अर्धवट असे माहिती**
**मुके जनावर बिचारे**
**मुकाट सारे सोसती**
**सेल्फी काढी आपण**
**नागास घेऊन संगती**
**खेळणे करतो त्यांचे**
**खेळात फुका रंगती**
**नाव घेऊनि पुजेचे**
**करी हिकमती किती**
**नाग आपलाचं मित्र**
**विसरून जातो नाती**
**जाणू नागोबा महती**
**बदलू आता विकृती**
**जगा आणि जगू द्या**
**जगास द्या संस्कृती**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

## परतूर आठवडी बाजारात भाजीविक्रेत्यांसह ग्राहकांचे हाल!




**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील आठवडे बाजारात नगरपालिकेची कुठलीही सुविधा नसल्याने भाजीपाला विक्रेते तसेच ग्राहकांना अतोनात त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यातच मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे शनिवारच्या आठवडे बाजारात चिखलच चिखल झाल्याने त्रासात आणखी भर पडली. या शहराला कोणी वाली आहे की नाही असा प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहे.

शहरात गाव भागात मध्यवर्ती बसस्थानकाजवळ दर शनिवारी आठवडे बाजार भरतो. परंतु बाजाराच्या ठिकाणी नगरपालिकेच्या वतीने कुठलीही सुविधा देण्यात आलेली नाही. भाजीपाला विक्रेत्यांना बसण्यासाठी पुरेसे ओटे नाहीत. पिण्याच्या पाण्याची सोय नाही. इतरही कुठल्या सुविधा नाहीत.वसुली मात्र नियमित केली जाते. त्यातच मागील दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे बाजारात चिखलच चिखल झाला आहे. भाजी विक्रेत्यांना अक्षरशः चिखलतच आपली दुकाने लावावी लागली.बाजारात मोकाट जनावरांचा सुळसुळाट झाला आहे.

बाजारात आवश्यक त्या सुविधा देण्यात याव्यात या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येते. बाजाराची अवस्था पाहून या शहरात नगरपालिकेचे कार्यालय आहे की नाही असा प्रश्न पडतो. तसेच शहराला तसेच तालुक्याला लाभलेल्या लोकप्रतिनिधिंचे देखील शहरातील नागरी समस्याकडे कमालीचे दुर्लक्ष असल्याने तक्रार करावी तरी कोणाकडे असा प्रश्न निर्माण झाला आहे.



शहरातील आठवडे बाजारात कुठल्याही सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.

शहरात देखील नागरी समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. वाढलेल्या समस्याकडे कोणाचेही लक्ष नाही.नगरपालिकेचे कमालीचे दुर्लक्ष आहे. पालिकेच्या निवडणुका झाल्या नसल्याने नगरसेवक तसेच नगराध्यक्ष नाहीत.एकंदरीत नागरी समस्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी दिली.

### दलित-आदिवासी भूमिहीन कास्तकारांना हक्काचा सातबारा मिळावा

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची सरकारने अंमलबजावणी करावी - ॲड. भास्कर मगरे

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र सरकारने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर अंमलबजावणी केल्यास दलित आदीवासी भुमिहीन कास्तकरांचे कास्तपट्टे नियमानुकूलित होतील आणि धनदांडग्यांचे बेकायदेशीर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्काशित होईल असे प्रतिपादन शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड. भास्कर मगरे यांनी येथे केले. ते सोमवार (दि २८) रोजी बदनापूर येथे शिवसेना दलित आघाडीच्या तालुकास्तरीय मेळाव्यात बोलत होते.

ॲड. मगरे म्हणाले की, शिवसेना दलित आघाडी गेली अनेक वर्षांपासून जन आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष करीत आहे. मात्र, प्रशासकीय स्तरावर शासन निर्णय २८ नोव्हेंबर१९९१ अधिनियमाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे दलित आदीवासी भूमिहीन कास्तकरांना हक्काच्या सातबारापासून वंचित रहावे लागत आहे. गावगुंडांच्या त्रासाला बळी पडून अनेक दलित **पान २ वर**



### रस्त्यामधील विजेचे खांब हटवले

## चूक प्रशासनाची, आर्थिक भुर्दंड मात्र जनतेला का?- ॲड. बिल्होरे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रस्त्याच्या मधोमध असलेले आणि अपघाताला निमंत्रण ठरणारे विजेचे खांब अखेर हटविण्यात आले आहेत. ही कारवाई हिंदू महासभेचे देवगिरी प्रांत प्रमुख ॲड. ईश्वर शिवाजीराव बिल्होरे यांनी पाठवलेल्या कायदेशीर नोटीसीच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.



खांब हटवल्यानंतर ॲड. बिल्होरे माध्यमांशी बोलतांना म्हणाले की, विकासाच्या नावाखाली रस्ते रुंदीकरण झाले. मात्र, त्याआधी खांब न हटविल्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. याबाबत यांनी आरपीडीए कायद्यानुसार तात्काळ कारवाईची मागणी आपण केल्यानंतर प्रशासन जागे झाले. रस्ते तयार झाल्यानंतर खांब हलवणे म्हणजे हा जनतेला आर्थिक भुर्दंड आहे. सुखी प्रशासनाची असताना, जनतेला भुर्दंड का,? महावितरण व महापालिका यांच्यात समन्वयाचा अभाव आहे. आज खांब **पान २ वर**

# संपादकीय


## आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन

संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक स्तरावर वाघांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे म्हणून सेंट पिटरर्सबर्ग येथे झालेल्या व्याघ्र परिषदेत २९ जुलै हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून घोषित करण्यात यावा असा ठराव मांडण्यात आला त्याला सर्व देशांनी अनुमोदन दिल्याने हा दिवस जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. वाघ हा जंगलाचा राजा आहे. जंगलातील त्याची निर्धास्त चाल गगनभेदी डरकाळी या त्याच्या गुण वैशिष्ट्यामुळे वाघ हा सर्वांना आकर्षित करणारा प्राणी आहे. जगभरात कोणत्याही अभयारण्यात, जंगलातील सफरीवर गेलेल्या पर्यटकांचे पहिले आकर्षण वाघ दिसण्याचे असते. भारतीय संस्कृतीत तर वाघाला आदरयुक्त भीतीचे स्थान आहे. वाघाला जंगलाचा राजा असे संबोधले जाते. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी असून जनमानसात शौर्य, राजबिंडेपणा, सौंदर्याचे, राकटतेचे प्रतीक आहे म्हणूनच हिंदू संस्कृतीत वाघ पार्वतीचा अवतार असलेली देवी महिषासुरमर्दिनीचे व तिच्या अनेक रूपांचे वाहन बनले आहे. वाघ आणि आदिवासी जमातींचा हजारो वर्षाचा संबंध आहे. आदिवासी जमातीत वाघाला देव मानतात. वाघांचा कोप होऊ नये म्हणून ते वाघाला देव मानून त्याची पूजा करतात. वाघांच्या अनेक जाती आहेत. भारतातील पट्टेरी वाघ जगातील वैशिष्ट्यपूर्ण प्राण्यांपैकी एक मानला जातो. भारत हे वाघांचे माहेरघर मानले जाते. भारताप्रमाणेच आशिया व आफ्रिका खंडातील इतर देशातही वाघांचे अस्तित्व आढळते. पूर्वी वाघांची संख्या खूप होती परंतु मधल्या काळात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली. केवळ भारतातच नाही तर जगभरात वाघांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. खेळ, मनोरंजन आणि वाढत्या लोकसंख्येमुळे वाघांच्या आधीवासावर होणारे मानवी अतिक्रमण तसेच वाघांच्या अवयवांची तस्करी करण्यासाठी केली जाणारी शिकार यामुळे दिवसेंदिवस वाघांचे प्रमाण कमी होऊ लागले. वाघांचे प्रमाण इतके कमी झाले की एकेदिवशी वाघांची डरकाळी लुप्त होईल की काय अशी भीती निर्माण झाली. ही भीती अनाठायी नाही. कारण गेल्या काही वर्षात वाघांच्या शिकारीच्या अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत. चार वर्षांपूर्वी झालेल्या अवनी वाघिणीची शिकार कोण विसरेल? अवनी वाघिणीची शिकार झाल्यावर संपूर्ण देश हळहळला होता. अवनी प्रमाणेच गोव्यातही दोन वाघिणींची शिकार करण्यात आली होती. मागील चार वर्षात अनेक वाघांचे मृतदेह वनविभागाला आढळून आले आहेत. वाघ कमी होणे ही धोकादायक बाब आहे कारण जंगलात वाघ असणे हे समृद्ध जंगलाचे लक्षण समजले जाते. जंगलात असलेल्या अन्न साखळीत वाघ हा प्रमुख घटक समजला जातो. वाघांमुळे जंगलातील तृणभक्षी प्राणी व वनस्पती यांच्यात समतोल राखला जातो. वाघ नसतील तर जंगलात तृणभक्षी प्राण्यांची संख्या अमर्याद वाढेल व इतर निसर्गसंपदेवर या गोष्टीचा ताण पडेल परिणामी निसर्गचक्रच बिघडून जाईल. वाघ जंगलात असणे हे जंगलाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. वाघ असलेल्या जंगलात साधे लाकडूतोड करणारे व जंगलावर अवलंबून असणारव लोक भीतीपोटी जंगलात जात नाही त्यामुळे जंगलेही सुरक्षित राहतात. वाघ नाहीसे झाले की जंगलही नाहीसे होतील आणि जंगले नाहीसे झाल्यास निसर्गचक्रच बिघडून जाईल आणि त्याचे दुष्परिणाम केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागतील. तसे होऊ द्यायचे नसेल तर वाघांचे अस्तित्व टिकवले पाहिजे. आज या आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने वाघांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# बोगस डॉक्टरेट पासून सावध रहा!

मागच्या वर्षी मी एक लेख लिहिला होता, तो म्हणजे असले पुरस्कार नको रे बाप्पा ! त्याचे कारण म्हणजे, समाज माध्यमांचा गैरवापर करून खोटी प्रतिष्ठा ,प्रसिध्दी
मिळवू इच्छिणाऱ्या व्यक्तींकडून काही हजार रुपये घेऊन हे पुरस्कार सरळसरळ विकण्यात आलेले असतात .
तथाकथित पुरस्कार प्राप्त व्यक्ती त्या पुरस्कारासह छायाचित्रे काढून घेऊन,त्या सोबत स्वतःची माहिती देऊन प्रसार माध्यमे,समाजमाध्यमे यात ती प्रसिद्ध करून खोटी प्रतिष्ठा आणि खोटा मोठेपणा मिरवित राहतात.अजाण नागरिक या सर्व बोगस बाबींना भुलून पुरस्कार प्राप्त व्यक्तींना कधी समक्ष भेटून,फोन करून ,फेस बुक, व्हॉट्स प वर भरभरून शुभेच्छा देत राहतात.
असेच गैर प्रकार तथाकथित डॉक्टरेट ऑनररी डॉक्टरेट च्या बाबतीतही होत आहेत.
डॉक्टरेट किंवा ऑनररी डॉक्टरेट बोगस आहे,हे ओळखण्याच्या काही महत्वाच्या पुढील बाबी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत, जेणेकरून आपली आणि आपल्या मार्फत समाजाची, सरकारची आणि अन्य संबंधित व्यक्ती,संस्था यांची होणारी फसवणूक टळू शकेल.अन्यथा अशा व्यक्तिविरुद्ध विविध कलमांद्वारे गुन्हे दाखल होऊन
अशा बोगस पदव्यांपासून मिळणारी बोगस प्रतिष्ठा मिळणे तर दूरच राहील, पण आपल्या वाडवडिलांनी आणि आपण कष्टाने कमविलेली आहे ती खरीखुरी प्रतिष्ठा धुळीस मिळू शकेल.या बाबतीत काय



कायदेशीर कारवाई ला तोंड द्यावे लागू शकते,याविषयी कुणी कायदेतज्ञ,जाणकार वकील अधिक चांगला प्रकाश टाकू शकतील.
आता मिळणारी डॉक्टरेट किंवा ऑनररी डॉक्टरेट ही बोगस आहे, हे ओळखण्याच्या काही अत्यंत सोप्या बाबी आहेत.त्या आपण लक्षात घेतल्या पाहिजेत.
कुठलेही खरेखुरे विद्यापीठ हे,ह्या बोगस जाहिरातींप्रमाणे
समाज माध्यमातून जाहिराती देत नाही.तर ते अधिकृत वृत्तपत्रांमधूनच जाहिराती देत असतात.
ह्या जाहिरातीमध्ये ह्या बोगस विद्यापीठांचे पूर्ण पत्ते, लॅन्ड लाइन फोन नंबर नसतात. तर संपर्क साधण्यासाठी फक्त मोबाईल क्रमांक दिलेला असतो.
दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रावर सुद्धा बोगस विद्यापीठांचे पूर्ण पत्ते नसतात.
जगातील कुठलेही विद्यापीठ हे त्यांचे पदवीदान समारंभ हे त्यांच्या पदवीदान सभागृहात किंवा पदवीदान समारंभ अतिशय भव्य स्वरूपात करावयाचा असेल तरी तो त्यांच्या प्रांगणातच आयोजित करीत असतात. अशा पदवीदान समारंभांना त्या विद्यापीठाचे कुलगुरू, विद्यापीठाने निमंत्रित केलेले,तोलामोलाचे प्रमुख पाहुणे,विविध विभागांचे प्रमुख, संबंधित विद्यार्थी, पालक असे शेकडोंच्या संख्येने उपस्थित असतात.
कुठलेही खरेखुरे विद्यापीठ हे ऑनररी डॉक्टरेट साठी मुळात जाहिरातच देत नाही, तर ते स्वतःहून कुठल्या मान्यवर व्यक्ती ला अशी पदवी द्यायची ते ठरवीत असते.
बोगस पदव्यांचे बोगस पदवीदान समारंभ हे कुठल्यातरी पंचतारांकित हॉटेलमध्ये किंवा अशाच स्वरूपाच्या सभागृहात आयोजित करण्यात येतात.
आता हे सर्व बोगसच असल्यामुळे वर उल्लेख केला आहे त्याप्रमाणे तिथे कुणी कुलगुरू,प्रमुख पाहुणे ,हजारो विद्यार्थी,त्यांचे पालक असे कुणीही उपस्थित नसते. मात्र हे बोगस विद्यापीठ आंतरराष्ट्रीय आहे हे भासविण्यासाठी एकदोन आफ्रिकन,पाश्चात्य गोरी माणसे उभी केलेली असतात.
अर्थात ती सुद्धा ह्या टोळीचा भाग असतात. काही वेळा मात्र,अशा भानगडींची काही कल्पना नसलेल्या काही भारतीय प्रतिष्ठित व्यक्ती देखील उपस्थित राहून ,अशा बोगस पदवीदान समारंभांची प्रतिष्ठा,शान वाढवित असल्याचे दिसून येते.
कुठलेली खरेखुरे विद्यापीठ हे ऑनररी डॉक्टरेट साठी एक पैसाही घेत नाही. कारण ती पदवी ही सन्मान म्हणून देण्यात आलेली असते.
बोगस डॉक्टरेट, ऑनररी डॉक्टरेट ह्या पदव्या सरळ सरळ लाखो रुपये घेऊन देण्यात आलेल्या असतात.
बरं,ह्या टोळ्या परदेशातीलच असतील,तर असेही नाही! मागे मी शोध घेतला असता,अशा बोगस विद्यापीठाचा पत्ता चक्क सांगलीचा निघाला.मी स्वतः येऊन पैसे भरतो,आपला पत्ता पाठविल्यास बरे होईल,असे सांगितल्यावर त्यांनी फक्त शिवाजी चौक,सांगली इतकाच पत्ता दिला. माझ्या सांगली येथील एका मित्राला तिथे जाऊन शोध घेण्यास सांगितले असता,तास भर शोध घेऊनही त्याला हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, किंवा विद्यापीठाची साधी पाटीही कुठे दिसली नाही!मी संबंधित महिलेला फोन करून हे सांगितले तर तिने माझा फोन कट करून माझा नंबरच ब्लॉक करून टाकला.
माझ्या लक्षात आलेल्या काही बाबी मी वर नमूद केल्या आहेत. जाणकार मंडळी अधिक भर घालू शकतील.
तरी बोगस डॉक्टरेट, ऑनररी डॉक्टरेट मिळविण्यापासून सावध रहा. स्वतः फसू नका आणि ह्या पदव्या स्वतःच्या नावापुढे लावून इतरांना फसवू नका, असे कळकळीने सांगावेसे वाटते.
आपल्याला खरीखुरी डॉक्टरेट, खरीखुरी
ऑनररी डॉक्टरेट खरोखरच
खरेखुरे संशोधन करून मिळावी, समाजासाठी विशेष योगदान देऊन मिळावी,
यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**देवेंद्र भुजबळ, ९८६९४८४८००**

# नागपंचमीचे महत्त्व आणि नागदेवतेचे पूजन कसे करावे ?

श्रावणमास म्हणजे सणांचा मास (महिना) असेही या मासाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. श्रावणातील पहिला सण 'नागपंचमी'चा ! आपल्या कुटुंबाची नागभयापासून सदासर्वकाळ मुक्तता व्हावी, तसेच नागदेवतेचा कृपाशीर्वाद प्राप्त व्हावा', यासाठी प्रतीवर्षी श्रावण शुक्ल पक्ष पंचमीला म्हणजेच नागपंचमीला नागपूजन केले जाते. या वर्षी २९ जुलै या दिवशी नागपंचमी आहे. या दिवशी काही ठिकाणी मातीचा नाग आणून त्याची पूजा करतात, तर काही ठिकाणी वारूळाची पूजा केली जाते. या दिवशी स्त्रिया उपवास करतात. नवीन वस्त्रे, अलंकार परिधान करून नागदेवतेची पूजा करतात आणि त्याला दुधाचा नैवेद्य दाखवतात. या दिवशी काही चिरणे, कापणे वर्ज्य मानले जाते. सनातन संस्थेद्वारा संकलित या लेखात नागपंचमीचा इतिहास आणि महत्त्व पाहणार आहोत.

**नागपंचमीचा इतिहास :**
सर्पयज्ञ करणार्या जनमेजय राजाला आस्तिक नावाच्या ऋषींनी प्रसन्न करून घेतले. जनमेजयाने 'वर मागा', असे म्हटल्यावर सर्पयज्ञ थांबवण्याचा वर त्यांनी मागून घेतला. जनमेजयाने सर्पयज्ञ थांबवला, तो दिवस पंचमीचा होता.
शेषनाग त्याच्या फण्यावर पृथ्वी धारण करतो. तो पाताळात राहातो. त्याला सहस्र फणे आहेत. प्रत्येक फण्यावर एक हिरा आहे. त्याची उत्पत्ती श्रीविष्णूच्या तमोगुणापासून झाली. श्रीविष्णु प्रत्येक कल्पाच्या अंती महासागरात शेषासनावर शयन करतो. त्रेतायुगात श्रीविष्णूने रामाचा अवतार घेतला. तेव्हा शेषाने लक्ष्मणाचा अवतार घेतला. द्वापर आणि कली या युगांच्या संधीकाळात कृष्णाचा अवतार झाला. त्या वेळी शेष बलराम झाला.
श्रीकृष्णाने यमुनेच्या डोहातील कालिया नागाचे मर्दन केले. तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता.
पाच युगांपूर्वी सत्येश्वरी नावाची एक कनिष्ठ देवी होती. सत्येश्वर हा तिचा भाऊ होता. सत्येश्वराचा मृत्यू नागपंचमीच्या आदल्या दिवशी झाला. सत्येश्वरीला तिचा भाऊ नागरूपात दिसला. तेव्हा तिने त्या नागरूपाला आपला भाऊ मानला. त्या वेळी नागदेवतेने वचन दिले की, जी बहीण माझी भाऊ म्हणून पूजा करील, तिचे रक्षण मी करीन. त्यामुळेच त्या दिवशी नागाची पूजा करून प्रत्येक स्त्री नागपंचमी साजरी करते.




नागपूजनाचे महत्त्व - 'नागांतील श्रेष्ठ जो 'अनंत' तोच मी', अशी गीतेत (१०.२९) श्रीकृष्ण आपली विभूती सांगतो.
अनन्तं वासुकिं शेषं पद्मनाभं च कम्बलम् ।
शंखपालं धृतराष्ट्रं तक्षकं, कालियं तथा ||
अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया अशा नऊ जातींच्या नागांची आराधना करतात. त्यामुळे सर्पभय उरत नाही आणि विषबाधा होत नाही.'
नागपंचमीच्या दिवशी उपवास करण्याचे महत्त्व - सत्येश्वराचा मृत्यू नागपंचमीच्या आदल्या दिवशी झाला. त्यामुळे भावाच्या शोकात सत्येश्वरीने अन्न ग्रहण केले नाही. त्यामुळे त्या दिवशी स्त्रिया भावाच्या नावाने उपवास करतात. 'भावाला चिरंतन आयुष्य आणि अनेक आयुधांची प्राप्ती होवो आणि तो प्रत्येक दुःख आणि संकट यांतून तारला जावो', हेही उपवास करण्यामागे एक कारण आहे. नागपंचमीच्या आदल्या दिवशी प्रत्येक बहिणीने भावासाठी देवतांकडे हाक मारल्यास त्याचा भावाला लाभ होतो आणि त्याचे रक्षण होते.
निषेध - नागपंचमीच्या दिवशी काहीही चिरू नये, कापू नये, तळू नये, चुलीवर तवा ठेवू नये इत्यादी संकेत पाळावेत. या दिवशी भूमीखनन करू नये.
नागदेवतेचे पूजन कसे करावे ?
नागदेवतेचे चित्र काढणे : हळदमिश्रित चंदनाने भिंतीवर अथवा पाटावर नागाचे चित्र काढावे (अथवा नऊ नागांची चित्रे काढावीत.) आणि त्या ठिकाणी नागदेवतेचे पूजन करावे. 'अनंतादिनागदेवताभ्यो नमः ।' हा नाममंत्र म्हणत गंध, पुष्प इत्यादी सर्व उपचार समर्पित करावे.
षोडशोपचार पूजन : ज्यांना नागदेवतेची 'षोडशोपचार पूजा' करणे शक्य आहे, त्यांनी षोडशोपचार पूजा करावी.
पंचोपचार पूजन : ज्यांना नागदेवतेची 'षोडशोपचार पूजा' करणे शक्य नाही, त्यांनी 'पंचोपचार पूजा' करावी आणि दूध, साखर, लाह्या यांचा, तसेच कुळाच्या परंपरेनुसार खीर इत्यादी पदार्थांचा नैवेद्य दाखवावा. (पंचोपचार पूजा : गंध, हळद-कुंकू, पुष्प (उपलब्ध असल्यास दूर्वा, तुळशी, बेल) धूप, दीप आणि नैवेद्य या क्रमाने पूजा करणे.)
पूजनानंतर नागदेवतेला करावयाची प्रार्थना !
'हे नागदेवतांनो, श्रावण शुक्ल पक्ष पंचमीला मी जे हे नागपूजन केले आहे, या पूजनाने नागदेवता प्रसन्न होऊन मला नेहमी सुख देणार्या होवोत. हे नागदेवतांनो, मी हे जे पूजन केले आहे, त्यात अज्ञानाने वा अजाणतेपणी काही उणे-अधिक झाले असल्यास मला क्षमा करावी. तुमच्या कृपेमुळे माझी सर्व मनोरथ पूर्ण होवोत. माझ्या कुळामध्ये कधीही नागविषापासून भय उत्पन्न होऊ नये', अशी आपल्या चरणी प्रार्थना आहे.'

**सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

**पान १ वरुन**

## ओटीटी वरील ...

प्रसारित केले जात होते. ही बंदी माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० च्या कलम ६७ आणि ६७ ए नुसार लावण्यात आली आहे. यासोबतच आयटी (मध्यस्थ मार्गदर्शक व डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम, २०२१ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २९४ आणि 'महिलांचे अशोभनीय प्रदर्शन (प्रतिबंध) अधिनियम, १९८६' च्या कलम ४ अंतर्गतही संबंधित प्लॅटफॉर्म्सवर कारवाई करण्यात आली आहे.

मोबाईल आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे कुटुंबातील सर्वांनाच अश्लील जाहिरातींचा अनावश्यक भडिमार सहन करावा लागत आहे. विशेष करून बालमनावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून आल्याने सोशल मिडिया, वेबसिरीज आणि विविध प्सवर दिसणाऱ्या अश्लील जाहिरातींविरोधात आवाज उठवत हे थांबवण्यासह समाजाला एका सकारात्मक दिशेने नेण्यासाठी शासनाने त्वरित पावले उचलावीत, यासाठी आपण सतत पाठपुरावा करत आलो आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय सूचना व प्रसारण मंत्रालयाकडेही पाठपुरावा केला आणि ही गंभीर बाब निदर्शनास आणून दिली. काही प्रमाणात यश आले आहे. ही कारवाई समाजाच्या नैतिक आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक होती. अशा प्रकारचे प्लॅटफॉर्म्स तरुण पिढीला भरकटवणारे आहेत. आता ऑनलाइन गेमिंग ॲप्सवरही बंदी आणली पाहिजे. कारण यामुळे तरुणांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढत असून, शेतकरी, विद्यार्थी आणि व्यावसायिक यांच्यावर मानसिक ताण वाढत आहे. ऑनलाइन गेम्स हे समाजावर मंद पण खोल परिणाम करणारे व्यसन झाले आहे, असे त्या म्हणाल्या. या निर्णयामुळे देशातील डिजिटल माध्यमांना जबाबदारीने वागण्याचा इशारा देण्यात आला असून, अशा प्रकारच्या आभासी अश्लीलतेविरुद्ध समाजमनातूनही आता सकारात्मक हालचाल होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

## सर्वोच्च न्यायालयाच्या ...

आदीवासींना प्राण सुद्धा गमावावे लागले आहेत. महाराष्ट्र शासनाने मा. सवौच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन केल्यास राज्यातील दलित आदीवासी भुमिहीन कास्तकारांच्या नावे होऊ शकतात. आणि राज्यातील धनदांडग्यांचे बेकायदेशीर अतिक्रमण निष्काशीत होऊ शकते. कारण शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० नुसार राज्यातील दलित आदीवासी भुमिहीन कास्तपट्टे नावे करुन देण्याचे आदेश आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाचे २८ जानेवारी च्या आदेशात शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमातील तरतुदीनुसार बाकी अतिक्रमण निष्काशीत करण्याचे ज्या त्या राज्याला आदेशीत केले आहे. त्याविषयी मा. उच्च न्यायालय मुंबई सुमोटो मध्ये अंतरीम आदेशात म्हटले आहे की, २८ जानेवारी २०११ सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन महाराष्ट्र सरकार का करत नाही. आणि म्हणून महाराष्ट्र सरकारने शासन निर्णय १२ जुलै २०११ अधिनियम करुन मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन असे आदेश देत आहे की, नमुद परिच्छेद ७ (४) प्रयोजना व्यतिरिक्त प्रशासकीय स्तरावर शासन निर्णय १२ जुलै २०११ अधिनियमात तरतुद ९(२) नुसार तहसीलदार मनमानी करुन दलित आदीवासी भुमिहीन कास्तपट्टे बेकायदेशीर दाखवून धनदांडग्यांचे बेकायदेशीर १४ एप्रिल १९९० च्या नंतरचे अतिक्रमणाला संरक्षण देण्याचे काम करीत असल्याचे ॲड. मगरे यांनी म्हटले आहे.
यासंदभाने रामनगर येथील गटनं २०० गायरानमधील रिसतर आणि कायदेशीर मार्गाने मा. उपविभागीय अधिकारी जालनायांचेकडील अपिलातील लाभार्थी वगळून वाटेल त्या लाभार्थ्यांस सात बारा वाटप कला आहे. ज्यांनी पैशाचा व्यवहार केला त्यांना घरी बोलावून सात बारा वाटप केल्याचा गंभीर आरोपही ॲड. मगरे यांनी केला आहे. तर जे पैसे देत नाहीत अशांना आदेश असतांनाही सात बारा वर नोंद होत नाही. यासंदर्भात जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी जालना यांना लेखी निवेदन दिले असल्याचेही ॲड. मगरे यांनी सांगितले.
राज्य सरकारने आता या बाबींकडे लक्ष देऊन शासन निर्णयासह मा. सर्वोच्च न्यायलयाच्या आदेशाचे काटेकोर पालन करून कास्तपटे भुमिहीनांच्या नावे करुन सात बारावर त्यांची नोंद घ्यावी व धनदांडग्यांचे बेकायदेशीर असलेले अतिक्रमण निष्काशीत करावे असा ठरावही या मेळाव्यात घेण्यात आला.
यावेळी बाळराज जय खरात, पंडीत साबळे, यांच्यासह दलित आदीवासी भुमिहीन कास्तकरांची उपस्थिती होती.

## चूक प्रशासनाची ...

हटवले गेले असले, तरी हा निर्णय प्रशासनाने आधीच घ्यायला हवा होता, असा पुनरुच्चार करत त्यांनी प्रशासनावर जनतेच्या पैशांच्या अपव्ययाचा आरोप केला. अतिक्रमणातील गरिबांची घरे झटपट हटवली जातात; पण रस्त्यावर उभे जीवघेणे खांब मात्र दुर्लक्षित राहतात, अशी टिका करत, आता नागरिकांनीच प्रशासनाला जागे करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.
जालना शहरात अनेक रस्त्यावर मधोमध असलेल्या योजनेच्या खांबांना धडकून अपघात होत असताना, महानगरपालिका आणि महावितरण कंपनी हे काम तात्काळ हटविण्यासाठी पुढाकार घेत नसल्याने ॲड. बिल्होरे यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रभाकर सरक आणि महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना नोटीस पाठवून हे विजेचे थांब तात्काळ न हटविल्यास सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला होता.नोटीसमध्ये त्यांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातांकडेही लक्ष वेधले होते. खांबांमुळे अनेकांनी जीव गमावले, तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले. जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून जर कोणी रस्त्यावर जीविताला धोका पोहोचवत असेल तर तो सदोष मनुष्यवधास जबाबदार ठरतो, अशा स्पष्ट शब्दांत ड. बिल्होरे यांनी अधिकाऱ्यांना कायदेशीर तरतुदीची आठवण करून दिली होती. त्यानंतर महापालिका व महावितरण प्रशासन खडबडून जागे झाले असून रस्त्याच्या मधोमध असलेले विजेचे खांब काढण्यात आले आहे.

# शाळा सुरू होऊन ४५ दिवस उलटूनही अनेक विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांपासून वंचित

## लोकशाही मार्गाने समग्र शिक्षा अभियानाच्या मुंबई कार्यालयासमोर धरणे आंदोलन करू - शेख अब्दुल रहीम

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू होऊन सुमारे दीड महिना उलटला असताना राज्यातील अनेक शाळांमध्ये अजूनही विद्यार्थ्यांना संपूर्ण पाठ्यपुस्तकांचा पुरवठा झालेला नाही. काही शाळांना केवळ अर्धवट पुस्तके मिळाली आहेत, तर अनेक शाळांना अजिबातच पुस्तके प्राप्त झालेली नाहीत. या संदर्भात अनेक पालक आणि शिक्षकांनी तक्रारी नोंदवल्या असून, या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई येथे लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे.

विशेषतः छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत अत्यल्प प्रमाणातच पाठ्यपुस्तके उपलब्ध झालेली आहेत. यासंदर्भात हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ते शेख अब्दुल रहीम यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे की राज्यातील प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला शंभर टक्के मोफत पाठ्यपुस्तकांची पूर्तता करावी.

निवेदनाच्या संदर्भ क्र. ४ नुसार, राज्यात पाठ्यपुस्तकांची छपाई मागणीपेक्षा अधिक प्रमाणात झाल्याची माहिती समग्र शिक्षा परिषद मुंबईच्या पत्राद्वारे देण्यात आली आहे. यास अनुसरून मा. प्रकल्प संचालकांनी सर्व शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना तातडीने पाठ्यपुस्तकांचे समायोजन करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, प्रत्यक्षात अद्याप कार्यवाही झालेली नाही हे वास्तव आहे. परिणामी, शेकडो विद्यार्थी आजही अभ्याससामग्रीपासून वंचित आहेत.

छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात कृत्रिम तुटवड्यामुळे अनेक विद्यार्थी मोफत पाठ्यपुस्तकांपासून वंचित का राहिले? या प्रश्नांची गंभीर चौकशी होणे आवश्यक आहे. संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई व्हावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.



यापूर्वी निवेदन सादर करूनही समग्र शिक्षा परिषद, मुंबई यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्यामुळे पुन्हा विनंती करण्यात आली आहे की राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला आणि विशेषतः छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सर्व आवश्यक पाठ्यपुस्तकांची तात्काळ पूर्तता करण्यात यावी.

या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. अन्यथा विद्यार्थी हितासाठी समग्र शिक्षा अभियानाच्या मुंबई कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेख अब्दुल रहीम यांनी दिला आहे.

हे निवेदन राज्याचे प्रकल्प संचालक संजय यादव (खड) यांना ईमेल आणि व्हॉट्सपद्वारे सादर करण्यात आले असून, त्याची प्रत प्राथमिक शिक्षण संचालक पुणे, शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) छत्रपती संभाजीनगर व जालना यांनाही पाठवण्यात आली आहे.

# क्रीडा प्रबोधिनीतील मुलींचा विनयभंग करणाऱ्या व्यवस्थापकाला बडतर्फ करा- नंदा पवार

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील जिल्हा परिषदेच्या क्रीडा प्रबोधिनीतील मुलींचा विनयभंग करणाऱ्या व्यवस्थापकास सेवेतून बडतर्फ करून त्याच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी जालना जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा नंदा पवार यांनी केली आहे.

यासंदर्भात नंदा पवार यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने अप्पर जिल्हाधिकारी रीता मैत्रेवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जालना येथील रेल्वे स्टेशन रस्त्यावर जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात निवासी क्रीडा प्रबोधिनी मुलींचे वसतिगृह आहे . क्रीडा प्रबोधिनी वसतिगृहातील व्यवस्थापकांनी तिथल्या मुलींसोबत वारंवार अश्लील चाळे करत त्यांचा विनयभंग केला आहे,गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या फिर्यादीवरून वसतिगृहाचे व्यवस्थापक प्रमोद खरात यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या वसतिगृहातील भौतिक सुविधांसह वसतिगृह व्यवस्थापकाच्या कारभाराबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या.या तक्रारीच्या अनुषंगाने जालना पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांनी महिला केंद्रप्रमुख सुजाता भालेराव यांना सोबत दोन दिवसांपूर्वी वसतिगृहाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी अनेक मुलींनी व्यवस्थापक प्रमोद गुलाबराव खरात याच्याकडून होत असलेल्या गैरवर्तनाच्या गंभीर तक्रारीचा पाढाच वाचला. खरात हा मुलींना सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या रूममध्ये नेऊन छाती, पोट, पाठ व गळ्यावरून हात फिरविण्यासारखे अश्लील वर्तन करीत असल्याच्या अनेक तक्रारी करण्यात आल्या.



वसतिगृहात महिला प्रशिक्षक उपलब्ध असतांना देखील खरात याने एका मुलीची छाती मोजली होती, सदर मुलगी याप्रकाराने प्रचंड घाबरली होती. त्यावेळी खरात याने कोणाला सांगू नको, म्हणून दमदाटी केली होती.

मुलींसोबत वारंवार अश्लील वर्तन करणाऱ्या खरात याच्या संदर्भातील तक्रारीची गंभीर दखल घेत रविवारी रात्री गटशिक्षण अधिकारी मनोज कोल्हे यांनी फिर्याद दाखल केली आहे. तरीही पुन्हा असल्या प्रकारचे गंभीर प्रकार होऊ नये यासाठी क्रीडा प्रबोधिनी वसतिगृहातील व्यवस्थापक प्रमोद खरात यांला सेवेतून बडतर्फ करण्यात यावे व त्याच्यावर कठोर कारवाई करावी, नसता महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# निसर्गोपचार अभ्यासक्रम परीक्षेत लखन राठौर यांचे घवघवीत यश

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील लखन राठौर यांनी भारत सरकारच्या आयुष मंत्रालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या निसर्गोपचार अभ्यासक्रम परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.

पुणे येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी या संस्थेतून लखन राठौर यांनी ट्रीटमेंट असिस्टंट ट्रेनिंग कोर्स हा कोर्स प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केला आहे. या यशाबद्दल संस्थेच्या संचालिका प्रा. डॉ. के. सत्यलक्ष्मी आणि डॉ. मंदार देशपांडे यांच्या हस्ते राठौर यांना प्रमाणपत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. या एक वर्षाच्या अभ्यासक्रमात निसर्गोपचाराच्या विविध पद्धती जसे की मालिश थेरपी, ॲक्युप्रेशर, जलचिकित्सा (वॉटर थेरपी), मृत्तिकाचिकित्सा (मड थेरपी), योग, उपवास, संतुलित आहार, क्रोमो थेरपी, मॅग्नेट थेरपी, फिजिओथेरपी व फिटनेस यांचा समावेश होता. याशिवाय शरीरशास्त्र, शरीरक्रियाशास्त्र आणि निसर्गोपचार तत्त्वांचे सखोल शिक्षणही देण्यात आले.

या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त लखन राठौर यांनी विविध उपक्रम आणि स्पर्धांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. प्रजासत्ताकदिनी देशभक्तीपर नृत्य, महिला दिनी नारी जागरण गीत, स्वातंत्र्यदिनी देशशक्ती गीत सादर केले. गांधी जयंतीनिमित्त रस्ते स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. योग दिन आणि जागतिक ध्यान दिनी योग संगीताचे सादरीकरण केले. याशिवाय, पर्यावरण दिनानिमित्त निबंध व भाषण स्पर्धेत प्रथम क्रमांक, वादविवाद स्पर्धेत दुसरा क्रमांक आणि काव्य स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला. अभ्यासक्रमाच्या समारोप समारंभाचे सूत्रसंचालन आणि समन्वयाची जबाबदारीही राठौर यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

# काँग्रेसच्या प्रमुख कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील राजकारणाला आज एक नवा कलाटणी देणारा क्षण ठरला. पारेगाव येथील काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते नितीन कानडे आणि पीरपिंपळगाव येथील पांडुरंग कोल्हे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये अधिकृत प्रवेश केला आहे. हा प्रवेश माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वावर दृढ विश्वास आणि भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला.

चित्रकूट निवासस्थानी पार पडलेल्या या प्रवेश सोहळ्यावेळी नव्या कार्यकर्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आणि पक्षाकडून त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी वसंत काका शिंदे, मुकेश चव्हाण, पांडुरंग क्षीसागर आणि सतीश जारे यांचीही उपस्थिती लाभली. या पक्षप्रवेशामुळे जालना जिल्ह्यातील भाजप अधिक मजबूत होईल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.



# पर्यावरणाच्या रक्षणासाठी नागपंचमीच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साह दिसून येतो.श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिल्या जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते.नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो.नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे.याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे.या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो. परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षीत वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी.पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात.अशीही आख्यायिका आहे की एक शेतकरी शेत नांगरणी करीत असतांना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे.त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर,वखर,कोणतेही खोदकाम करीत नाही.त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अवजारांचा वापर केला जात नाही.भाज्या चिरायच्या नाही,तव्याचा वापर नाही,कांडन नाही,कापन नाही,असे काही नियम आजही पाळले जातात.नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुर्तीची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात.श्रावण माहिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज(सजावट)केल्या जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने पाळला जातो.श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची, शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वातावरण दिसून येते.श्रावण मासात विविध सण येतात त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात. सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे.सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे.पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा.तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील नाग मंडळेनाग पकडायच्या मोहिमेला निघत.यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची. परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली.त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतीकात्मक मुर्तीची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळामध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूर्तीची मिरवणूक काढतात.आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे.त्यामुळे संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे.आजही भारतातील महाराष्ट्र,राजस्थान, गुजरात,केरळ, तामिळनाडू या प्रांतात नाग पूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते.मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे.याठीकाणी नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे याठीकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात यात्रा असते.त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे.येथील अशी आख्यायिका आहे की भगवान शंकरजींचे तांडव सुरू असतांना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या.त्यामुळे या तिर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते. श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे.त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करतांना बेलफुल वापरण्यात येतो.भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी,वनस्पती, फुल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिलं जाते.त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणें अत्यंत गरजेचे आहे.याकरीता श्रावण महिन्याचे व नागपंचमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील व जंगलातील प्राण्यांना जंगलात रहाण्याचा आनंद मिळेल.आज पृथ्वीला वाचवायचे असेल तर प्रत्येक सणांना मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे .कारण वृक्षाशीवाय सृष्टी अधुरी आहे.त्यामुळे सर्वांसाठीच वृक्ष अनिवार्य आहे.पृथ्वी साबुत रहाली तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित राहील अन्यथा विनाश अटळ आहे.कारण वृक्ष कटाईमुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे.त्यामुळे भुकंप, महाप्रलय, सुनामी,अती थंडी,अती उष्णता, ज्वालामुखी, दुष्काळ,भूस्खलन, समुद्राची पातळी वाढते अशा विविध धोकादायक घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असून भयावह रूप धारण होत आहे.याकरीता येणाऱ्या विनाशापासुन वाचण्यासाठी झाडे लावा जीव सृष्टी वाचवा हा मूलमंत्र सर्वांनीच अंगिकारला पाहिजे.नागव्दार स्वामी की जय!जय नाग देवता!हर हर महादेव!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# एकाच अपिलार्थीचे ८१ अपील राज्य माहिती आयोगाने फेटाळले

## १९ अपिलार्थींचे ७ हजार ५६७ व्दितीय अपील फेटाळले

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** नांदेड येथील जनक रामराव गायकवाड या अपिलार्थीने राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल केलेले ८१ द्वितीय अपील आयोगाने फेटाळले आहेत. यासोबतच १९ अपिलार्थींनी दाखल केलेले ७ हजार ५६७ व्दितीय अपील आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळले आहेत.

अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील नमूद अपिलार्थी यांची द्वितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

बहुतांश अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार अर्ज सादर करतात. अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी यांनी जेवढ्या ग्रामपंचायत कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केले त्या सर्व ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र जन माहिती अधिकारी पदनिर्देशित आहेत. मात्र अशा सर्व जन माहिती अधिकारी यांचेसाठी केवळ एकच प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित आहेत. बहुतांश वेळा अपिलार्थी जेवढे माहितीचे अर्ज दाखल करतात जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले दाखल करतात. या परिस्थितीत दैनदिन कामकाज सांभाळून अपिलाची यांच्या दाखल प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. मोठ्या संख्येने प्राप्त झालेल्या अर्जाचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावरुन होऊन सर्वसामान्य नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत या अपिलार्थी यांची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या .िळल.ारहरीरिहींर.सीें.ळप या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत आहेत. त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये, प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे, त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्थान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

पुढील अपीलार्थींची आयोगाने द्वितीय सुनावनी घेवून अपीले फेटाळली आहेत. केशवराव निंबाळकर यांची आयोगाकडे दाखल २७८८ द्वितीय अपिले २६ जुन २०२४ तर ८४२ द्वितीय अपिले १९ डिसेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. शरद दाभाडे यांची १५९ द्वितीय अपिले २६ एप्रिल, २०२४ तर ९८५ द्वितीय अपिले २७ सप्टेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मोतीराम गयबु काळे यांची आयोगाकडे दाखल ४६३ द्वितीय अपिले २३ सप्टेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाळासाहेब भास्कर बनसोडे यांची आयोगाकडे दाखल २५६ द्वितीय अपिले २० डिसेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. श्रीमती अनिता नितीन वानखेडे यांची आयोगाकडे दाखल ११६ द्वितीय अपिले ०६ सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाबुराव धोंडु चव्हाण यांची आयोगाकडे दाखल १९८ द्वितीय अपिले २० जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. जयभीम नरसिंगराव सोनकांबळे यांची आयोगाकडे दाखल १७६ द्वितीय अपिले ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. हरि प्रताप गिरी यांची आयोगाकडे दाखल २९६ द्वितीय अपिले २८ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. विनोदकुमार भारुका यांची आयोगाकडे दाखल २३६ द्वितीय अपिले २८ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. गिरीश म. यादव यांची आयोगाकडे दाखल २०६ द्वितीय अपिले २३ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. संजय हाबु राठोड यांची आयोगाकडे दाखल १०० द्वितीय अपिले ३० ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. रायभान किसन उघडे यांची आयोगाकडे दाखल २१६ द्वितीय अपिले ३० सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बालाजी बळीराम बंडे यांची आयोगाकडे दाखल १५६ द्वितीय अपिले ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. भालचंद्र साळुंके यांची आयोगाकडे दाखल १०३ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मिलिंद दगडु मकासरे यांची आयोगाकडे दाखल १२५ द्वितीय अपिले ३० ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. ज्ञानेश्वर धायगुडे यांची आयोगाकडे दाखल ८६ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. सुरज नंदकिशोर व्यास यांची आयोगाकडे दाखल ६३ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत.

श्रावण निमित्त शंभु महादेव येथे भव्य शोभायात्रा आणि महाआरतीचा उत्साह

# श्रावण महिना हा श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा संगम - आ. लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** श्रावण महिन्याच्या पवित्र सोमवारनिमित्त जालना जिल्ह्यातील प्राचीन आणि श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र पांगरी येथील शंभू महादेव मंदिरात आमदार बाबनराव लोणीकर यांनी आज दुपारी १ वाजता भक्तिभावाने दर्शन घेतले. महंत बालकगिरी महाराज आणि भागवत गिरी महाराज यांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. यावेळी हजारो भाविकांची उपस्थिती होती आणि परिसरात भक्तिपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

पांगरीमधून महादेव मंदिरापर्यंत काढण्यात आलेली शोभायात्रा ढोल-ताशा, भगवे झेंडे आणि हर हर महादेवच्या घोषणांनी दुमदुमली. भगव्या वेशात, फेटे बांधलेल्या कार्यकर्त्यांचा उत्साह आणि भक्तांची एकत्रित उपस्थिती हे सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले.

प्रसंगी आ. लोणीकर म्हणाले की, श्रावण महिना हा श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा संगम आहे. या पवित्र महिन्यात प्रत्येकाने आपल्या मनातील नकारात्मकता दूर करून शंकराच्या चरणी सेवा-भक्ती करावी.



माझं भाग्य आहे की, माझ्या तालुक्यात इतकं प्राचीन आणि शक्तीशाली स्थान आहे जिथे महादेवाचे स्मरण करणारा प्रत्येक सोमवार भक्तीभावाने साजरा होतो.

मी स्वतः हाताने महाप्रसाद वाटून सर्व भाविकांचे आभार मानले.

या ठिकाणी धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लवकरच येथे भाविकांसाठी विश्रामगृह, पाण्याची सुविधा आणि सुसज्ज सभागृह उभारले जाईल, असे आश्वासनही आ. लोणीकर यांनी उपस्थित भाविकांना दिले.

**धार्मिक एकतेचा संदेश**

आमदार लोणीकर यांच्या हस्ते मंदिरात विशेष पूजा, रुद्राभिषेक आणि महाआरती पार पडली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधताना श्रावणात सामाजिक आणि धार्मिक ऐक्याचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी त्यांनी जलसंधारण, वृक्षलागवड आणि गावपातळीवरील विकासकामांची माहिती देखील दिली.

**अनेक मान्यवरांची उपस्थिती**

कार्यक्रमासाठी तालुक्यातील अनेक गावांमधून भक्तांनी हजेरी लावली. यामध्ये भाजप नेते राहुल लोणीकर, संपत देशमुख, बाळासाहेब वाघ, संतोष गवळी, प्रदीप पाटील, विनोद चव्हाण, राजू लोंढे, अशोक वाघमारे, महेश चव्हाण, नवनाथ पाटील, विठ्ठल देशमुख आदींचा समावेश होता.

**संस्कृती व परंपरेचा संगम**

पांगरी येथील श्रावणी सोमवारची परंपरा अनेक दशकांपासून सुरू आहे. यंदा आमदार लोणीकर यांच्या पुढाकाराने हा उत्सव अधिक भव्य स्वरूपात पार पडला. त्यांच्या हस्ते सुरू झालेला 'भंडारा महाप्रसाद' हा शेकडो भाविकांसाठी आकर्षण ठरला.

# एकल महिलांच्या विद्यार्थ्यांना शालेय सहित्याचे वाटप



**परतूर । प्रतिनिधी -** एकल महिला समिती महाराष्ट्र राज्य व आझाद बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाटुर यांच्या स्तुत्य उपक्रम एकल महिला साठी शासकीय योजना जनजागृती व लाभ मिळून देणे हे ध्येय चला माणुस म्हणुन संवेदना जाणुया या प्रमाणे आज कोरोना महामारी नंतर समाजा मध्ये एकल महिलाची संख्या खुप मोठ्या प्रमाणावर वाढली या एकल महिला सामाजिक अर्थिक संकटात असतात त्याना विविध उपक्रम योजना महिती व त्याना न्याय देण्यासाठी माहेरंब कुलकर्णी प्रतिमाताई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने महाराष्ट्र मध्ये साउ एकल महिला समिती स्थापन करण्यात आली. या माध्यमातुन आझाद बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाटुर याच्या संयुक्त विद्यमाने समाजातील एकल महिला परीतक्त कुटुंब कलह मध्ये अडकलेले बालका शैक्षणिक पालकत्व स्विकारूण शैक्षणिक सहित्य वाटप करण्यात आले. या मध्ये दप्तर वही पुस्तक पेन कम्पास पाणी बॉटल डब्बा बॅग एक शालेय ड्रेस व इतर शैक्षणिक वस्तु वाटप करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी डॉ. उध्दव चव्हाण, प्रमुख पाहुणे एकनाथ राऊत, अध्यक्ष, बालकल्याण समिती जालना, संजय अवारे, हेल्प फाउंडेशन वाटुर, गौतम प्रधान, दत्ता शिंदे. नितीन पाटोळे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तयब पठाण अध्यक्ष आझाद बहुउउदेशिय सेवाभावी संस्था राजेश राउत. रोहन राउत . फैजान्न शेख यांनी परिश्रम घेतले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.